स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर “वंदे मातरम” या राष्ट्रगीतास १५० वर्षपूर्तीनिमित्त पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई, आकाशवाणी मुंबई व भारतीय नौदल यांच्या संयुक्त सहकार्याने दि.१२.०८.२०२६ रोजी होणाऱ्या कार्यक्रमाच्या आयोजनावर अकादमीच्या वतीने करण्यात येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०२६/प्र.क्र.११७(ई-१७९६८२६)/सां.का.२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६.

वाचा : १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पत्र क्र.संकीर्ण-८२२४/प्र.क्र.५०५/सां.का.४, दि.१८.०३.२०२६
२) संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र. पुलदे/२०२६ /जा.१०१६, दि.०४.०८.२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने “वंदे मातरम” या राष्ट्रगीतास १५० वर्षेपूर्ती निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्याबाबत केंद्र शासनाचे निर्देश असून, याबाबत या विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये राज्यांतर्गत सदर कार्यक्रम/उपक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांनी त्यांच्या संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये कळविल्यानुसार मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांनी दि.२९.०७.२०२६ रोजी अकादमीमध्ये झालेल्या बैठकीत स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर “वंदे मातरम” या राष्ट्रगीतास १५० वर्षेपूर्ती निमित्त पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई, आकाशवाणी मुंबई व भारतीय नौदल यांच्या संयुक्त सहकार्याने दि.१२.०८.२०२६ रोजी अकादमीच्या आवारात संगितमय कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. सदर कार्यक्रमामध्ये नौदलाचे ६० कलाकारांचे संगीतमय सादरीकरण करण्यात येणार आहे आणि सदर कार्यक्रमामध्ये आकाशवाणी मुंबई यांचे ध्वनी प्रसिध्दी, ध्वनी संयोजन, युटयुबद्वारे थेट प्रसारण, निवेदन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी सदर कार्यक्रम आयोजन करण्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विनंती केली आहे. त्या अनुषंगाने सदर कार्यक्रमाच्या आयोजनावर अकादमीमार्फत होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर “वंदे मातरम” या राष्ट्रगीतास १५० वर्षपूर्तीनिमित्त पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई, आकाशवाणी मुंबई व भारतीय नौदल यांच्या संयुक्त सहकार्याने दि.१२.०८.२०२६ रोजी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथील आवारात नौदलाचा संगितमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाकरीता आकाशवाणी मुंबई यांचे ध्वनी प्रसिध्दी, ध्वनी संयोजन, युटयुबद्वारे थेट प्रसारण, निवेदन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन अकादमीच्या वतीने करण्यात येणार असून, त्या अनुषंगाने येणाऱ्या अंदाजित खर्चास एकूण रु.१,००,०००/- (एकूण रुपये एक लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. अकादमीमार्फत सदर कार्यक्रम आयोजनावर होणाऱ्या अंदाजित खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	तपशील	अंदाजित खर्च रक्कम (रूपये)
१	समारंभासाठी आवार सजावट (अतिरिक्त दिवे, फ्लेक्स चौकटी फिक्सिंग, फुलांची रंगमंचावरील व आवारातील सजावट, कार्पेट आणि तत्सम)	२५,०००/-
२	समारंभासाठी रंगमंच नेपथ्य, फ्लेक्स, प्रसिध्दी पोस्टर व तत्सम साहित्य इ. यांची छपाई व मांडणी, रंगमंचमीय व्यवस्थापन (खुर्च्या, बॅकड्रॉप, शोभेची फुले इ.)	२०,०००/-
३	वृत्तपत्रांमध्ये जाहिरात पत्रिका हयाचे वाटप (२ दिवस)	१०,०००/-
४	खानपान खर्च ६० कलाकार, अधिकारी, प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधीसाठी चहापान व्यवस्था व स्वयंसेवक हयाचे खानपान	४०,०००/-
५	अन्य आकस्मिक खर्च	५,०००/-
	एकूण	**१,००,०००/-**

३. या बाबींवर होणारा खर्च **“मागणी क्र. झेडडी-०२, २२०५ कला व संस्कृती (१०१) ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (२२०५१४६३) ५० इतर खर्च (अनिवार्य)"** या लेखाशीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग दोन, दिनांक १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उप विभाग तीन, अ.क्र. नियम २७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व सचिव, सांस्कतिक कार्य विभाग यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर कार्यक्रमासाठी होणाऱ्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी शासनास विहित वेळेत सादर करावे.

६.   हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८१२१८२३४९८१४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GITA N YADAV

Digitally signed by GITA N YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=84EC8C867E177247130C5B2CE9EBE952BC911B16D489B8758 9C254E58ADC24EC, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=86C33C507529F3B895BCCC45E562FC0EBC4D9E29CBB 4691C6759762E25DEC5EA, cn=GITA N YADAV
Date: 2026.08.12 18:25:14 +05'30'

(गिता यादव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
३. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. उप सचिव (सां.का.४), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
८. अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती,सां.का.२